पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शिक्षण समिती

कार्यपत्रिका क्रमांक – १४

**सभावृत्तांत**

**दिनांक – ०५/०३/२०२०** **वेळ - दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **०५/०३/२०२०** रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.सागर बाळासाहेब गवळी
३. मा.वैशाली जालिंदर काळभोर
४. मा.सुलक्षणा राजू धर
५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
६. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.अरुण जागडे – प्र.नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण अंतर्गत येणा-या सर्व बालवाडीतील विद्यार्थीकरिता ई-लर्निंग संच पुरविण्याबाबत – मा.रेखा दर्शले, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका नेवाळेवस्ती प्राथमिक शाळा क्र.८८ येथे हस्ताक्षर सुधारणा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर स्पार्कल क्लास मार्फत राबविणेबाबत – मा.रेखा दर्शले, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळा स्मार्ट सिटी अंतर्गत अद्ययावत करणेबाबत – मा.रेखा दर्शले, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांच्या दालनामध्ये पडदे लावण्याबाबत – मा.रेखा दर्शले, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विभागातील शाळेतील विद्यार्थीनीना शालेय हाफ जॅकेट महराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय) मार्फत थेट खरेदी करण्याबाबत. – मा.रेखा दर्शले, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव.

दिनांक २०/०२/२०२० व २७/०२/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ५६ विषय क्रमांक - १

दिनांक - ०५/०३/२०२०

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

मा.रेखा दर्शले, मा.वैशाली काळभोर यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थामध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरीता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. मनपाच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थाप्रमाणे बालवाडीतील सर्व विद्यार्थ्यांना ई-लर्निंग संचा मार्फत प्रशिक्षण दिल्यास बालवाडी विद्यार्थ्यानाही लहानपणापासूनच शिक्षणाची ओढ निर्माण होऊन आपल्या मनपा बालवाडी विद्यार्थाच्या पट संख्येत वाढ होईल. ई-लर्निंग संच मध्ये महाराष्ट्र शासनाच्या बालभारती पाठयपुस्तकाच्या आधारे अभ्यासक्रम शिकविला जात आहे. बालवाडी विद्यार्थांना ई-लर्निंग संच पुणे जिल्हा परिषदेच्या सर्व बालवाडी तसेच अंगणवाडी मार्फत शिक्षण दिले जात आहे. याकामी निविदा प्रक्रीया राबविण्याची प्रक्रीया लवकरात लवकर करणेस मान्यता देणेत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५७ विषय क्रमांक - २

दिनांक - ०५/०३/२०२०

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

मा.रेखा दर्शले, मा.वैशाली काळभोर यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव येथील यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळेमध्ये हस्ताक्षर सुधारणा प्रकल्प स्पार्कल क्लास मार्फत राबविण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प १०० टक्के यशस्वी झालेला आहे. त्याचप्रमाणे मनपा नेवाळे वस्ती प्राथमिक शाळा क्र.८८ मुख्याध्यापकांनी हस्ताक्षर सुधारणा प्रकल्प स्पार्कल क्लास मार्फत राबविण्यात यावा याबाबत विनंती केलेली आहे. सदर प्रकल्प प्रायोगिक तत्वावर स्पार्कल क्लास मार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका नेवाळे वस्ती प्राथमिक शाळा क्र.८८ येथे राबविणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५८ विषय क्रमांक - ३

दिनांक - ०५/०३/२०२०

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

मा.रेखा दर्शले, मा.वैशाली काळभोर यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण समिती सदस्याचा पाहणी दौरा चालू आहे. सदर दौ-यामध्ये महानगरपालिकेच्या १३ प्राथमिक शाळा ह्या स्मार्ट सिटी अंतर्गत अद्यावत करण्यासाठी देण्यात आलेल्या आहेत, त्या शाळेमध्ये विद्यार्थांना शिकण्यासाठी अत्याधुनिक साहित्य, संगणक कक्ष, Digital Class Room वैगेरे बनविण्यात आलेले आहे. त्यामुळे विद्यार्थांनाही शिक्षणाची आवड निर्माण होत आहे. तसेच आपल्या मनपा शाळेच्या पट संख्येतही वाढ होण्यास मदत होईल. अशाच प्रकारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळा स्मार्ट सिटी अंतर्गत अद्यावत करण्यास दिल्यास मनपाच्या सर्व शाळांमधील विद्यार्थामध्ये मानसिक, शारिरीक, शैक्षणिक गुणवत्ते मध्ये वाढ होऊन आपल्या मनपा शाळामध्ये पट संख्येतही वाढ होण्यास मदत होईल. याकामी अंमलबजावणी लवकरात लवकर करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५९ विषय क्रमांक - ४

दिनांक - ०५/०३/२०२०

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

मा.रेखा दर्शले, मा.वैशाली काळभोर यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण समिती सदस्याचा पाहणी दौरा चालू असताना असे निदर्शनास आले की, शाळेच्या मुख्याध्यापकांच्या दालनामध्ये तसेच संगणक कक्ष, ग्रंथालय येथील खिडक्यांना पडदे नसल्याने खूप प्रकाश तसेच धूळ दिसून येत आहे. तसेच शाळेच्या मुख्याध्यापकांनीही शाळेत सदर दालनामध्ये पडदे लावून देण्याची विनंती केलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळांमधील आवश्यक मागणी केलेल्या मुख्याधापकांच्या शाळेत लवकरात लवकर खिडक्यांना पडदे बसवून देण्याची कार्यवाही लवकरात लवकर करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६० विषय क्रमांक - ५

दिनांक - ०५/०३/२०२०

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

मा.रेखा दर्शले, मा.वैशाली काळभोर यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इ.५ वी ते इ.१० वी मधील विद्यार्थिनी तसेच उर्दू माध्यमाच्या इ. ३ री ते इ.४ थी तील विद्यार्थीनी करिता प्रत्येकी २ शालेय जॅकेट

पुरवठा करणेस सहमती दर्शविल्याचे महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांचे दिनांक – ०७/०२/२०२० रोजी पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित हा महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय असून महाराष्ट्र शासनाचे अधिकृत गणवेश पुरवठादार असल्याचे व महाराष्ट्र राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयास पुरवठा करीत असल्याचे कळविले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विभागातील शाळेतील इ ५ वी ते १० वी व उर्दू माध्यमाच्या इ.३ री व ४ थी च्या विद्यार्थीनींना प्रत्येकी २ शालेय हाफ जॅकेट, तसेच मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थिनींना हेयर बँड, रेबीन महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित ( महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय ) मार्फत थेट खरेदी करणेस तसेच त्यासाठी अंदाजे २ कोटी किंवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(पवार मनिषा प्रमोद)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१३१/२०२०
दिनांक : ०५/०३/२०२०



**( अरुण हरिभाऊ जागडे )**
प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.